दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र ● मंगळवार दि.१९ नोव्हेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -८८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## दर्यापूरमध्ये नवनीत राणांच्या प्रचारसभेत मोठा गोंधळ

**अमरावती**–अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील खल्लार गावात माजी खासदार नवनीत राणा यांच्या प्रचारसभेदरम्यान मोठा गोंधळ घडला. प्रचारसभेच्या दरम्यान काही लोकांनी नवनीत राणा यांच्या अंगावर खुर्च्या फेकल्या, ज्यामुळे गोंधळ माजला. त्यानंतर दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली आणि जमावाने घोषणाबाजी केली. पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. शनिवारी रात्री आयोजित केलेल्या या प्रचारसभेत युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रमेश बुंदीले यांच्या प्रचारासाठी नवनीत राणा उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या दरम्यान दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला, जो झडप आणि मारामारीत रूपांतरित झाला. खुर्च्या फेकल्या गेल्या आणि दोन गटांमध्ये धक्काबुक्की व तोडफोड सुरू झाली. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि स्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. तथापि, राड्यानंतर काही कार्यकर्त्यांना दुखापत झाल्याची माहिती आहे. या गोंधळामुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. नवनीत राणा यांनी या घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त करत पोलिसांत तक्रार दाखल केली.

# केज विधानसभा निवडणुकीत नमिता मुंदडा विरुद्ध पृथ्वीराज साठेंच्यात तगडी लढत

### अंजली घाडगेची उमेदवारी डावलल्यामुळे बौद्ध समाज संभ्रमात;भाजपा,मनसे कडे जाण्याची दाट शक्यता

### भाजपची नियोजन बद्ध प्रचार यंत्रणा तर राष्ट्रवादी कडे अंबाजोगाई व केज मधुन तरुणांची मोठी फळी मैदानात

**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघातील भाजप महायुतीच्या उमेदवार नमिता अक्षय मुंदडा यांच्या साठी भाजपने नियोजन बद्ध प्रचार यंत्रणा लावलेली असताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार माजी आमदार पृथ्वीराज साठे यांच्या साठी अंबाजोगाई व केज मधुन तरुणांची मोठी फळी मैदानात उतरली तगडी प्रचार यंत्रणा राबविण्यात येत आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपणार असुन आणखी ३ दिवसांनी २० नोव्हेंबर रोजी मतदार राजा आपला आमदार निवडण्यासाठी लोकशाहीतील आपला मतदानाचा हक्क बजावणार आहे. बीड जिल्ह्यातील केज विधानसभा मतदार संघात भाजप महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार माजी आमदार पृथ्वीराज साठे यांच्यात सरळ लढत होत असताना निवडणुक प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात मतदार संघात एकीकडे पृथ्वीराज साठे हे एकाकी पडल्या सारखे चित्र होते तर दुसरीकडे नमिता मुंदडा यांचे पारडे जड वाटत होते. मात्र दुसऱ्या टप्प्यात अंबाजोगाई शहरातून राजकिशोर मोदी व बबन लोमटे तर केज मधुन खासदार बजरंग बप्पा सोनवणे सह माजी आमदार संगीता ठोंबरे,डॉ. अंजली घाडगे, हारुन भाई इनामदार, नगराध्यक्षा सिताताई बनसोड या बड्या नेत्यांची ताकत मिळाल्याने पृथ्वीराज साठे यांचे पारडे जड दिसू लागले आहे. या दरम्यान जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी व्युव्हरचना आखली, मतदार संघातील सर्व नाराज गट तट यांना आपलंस करण्यासाठी अक्षय मुंदडा यांनी पुढाकार घेतला आणि यात त्यांना यश ही आले त्यामुळे ही लढत तुल्यबळ बनल्या गेली आहे. प्रचाराच्या तिसऱ्या टप्प्यात भाजप नेत्या पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी मतदार संघातील नाराज वंजारी समाजाच्या प्रमुख नेत्यांची गुप्त बैठक घेऊन त्यांना नमिता मुंदडा यांच्या प्रचारार्थ कामाला लावले. या सर्वासह समाज बांधवांची नाराजी दूर करण्यासाठी पंकजाताई मुंडे व डॉ.प्रीतमताई मुंडे यांनी केज, विडा, येवता सर्कल मध्ये नमिता मुंदडा यांच्या साठी जाहीर सभा घेतल्या. अंबाजोगाई मध्ये केंद्रीय रस्ते विकास





मंत्री ना. नितीन गडकरी यांची सभा घेण्यात आली. याच काळात नमिता मुंदडा यांच्या साठी आरएसएस परिवार व भाजप मधील निष्ठावंत मंडळीही कामाला लागली. अक्षय मुंदडा ही मतदार संघातील छोट्या छोट्या घटकापर्यंत जाऊन पोचले त्यांच्याशी संवाद साधला. एकूणच नमिता मुंदडा यांच्या साठी भाजपने नियोजन प्रचार यंत्रणा लावलेली दिसून आली. तर दुसरीकडे नमिता मुंदडा यांच्या विरोधात मतदार संघातील सर्वच विरोधकांनी पृथ्वीराज साठे यांच्या पाठीशी आपली ताकत लावलेली असताना व त्यांच्या साठी राष्ट्रवादी श.प. काँग्रेसचे जयंत पाटील, आ.रोहित पवार सह राज्यसभा खासदार फौजिया खान यांच्या जाहीर सभा घेण्यात आल्या नंतर अंबाजोगाई मधुन राजकिशोर मोदी मित्र मंडळ, दिग्विजय लोमटे मित्र मंडळ, केज मधून खा. बजरंग सोनवणे मित्र मंडळातील आणि मुस्लिम समाजातील तरुणांची फळी मैदानात उतरलेली दिसत असून दोन्ही उमेदवारा कडुन भ्रमणध्वनी मार्फत प्रत्येक मतदारा पर्यंत कॉल करून मतदान करण्या संदर्भात आवाहन करण्यात येत आहे. दोन्ही उमेदवार व दोघांची प्रचार यंत्रणा, नियोजन पाहता एक रंजतदार सामना केज मतदार संघात पहावयास मिळत असून मतदार संघात जरांगे फॅक्टर व वंजारा समाज कशा पद्धतीने भूमिका घेतो यावर मतदार संघाचा निकाल अवलंबून राहणार आहे. ज्या बौद्ध समाजाने बजरंग सोनवणेना लोकसभेच्या निवडणुकीत मतदान केले त्या समाजास शरद पवार यांनी उमेदवारी न देता पक्षाची उमेदवारी मुंदडांचे पूर्वीचे शिष्य पृथ्वीराज साठे यांच्या गळ्यात माळ एकनिष्ठेच्या जोरावर पडली गेली आणि येथेच माशी शिंकली. अंजली घाडगेची उमेदवारी डावलल्यामुळे बौद्ध समाज संभ्रमात असल्यामुळे तो भाजपा किवा मनसे कडे जाण्याची दाट शक्यता आहे. एकूणच केज विधानसभा निवडणुकीत नमिता मुंदडा विरुद्ध पृथ्वीराज साठे यांच्यात तगडी लढत पहावयास मिळणार आहे.

## श्रीराम नगरातील अतिक्रमण न.पा.प्रशासनाने हटविले



**लोहा । प्रतिनिधी**

दि.(१८) नोव्हेंबर रोजी अखेर शहरातील श्रीराम नगरातील किरण दाढेल हटविण्यासाठी रहिवाशांच्या विधानसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारामुळे न.पा.प्रशासनाने सदरिल अतिक्रमण हटविले.

लोहा शहरातील मराठ गल्ली व श्रीराम नगर कन्या शाळेच्या समोरील रस्त्यावरील दोन्ही बाजूने करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना मोठी अडचण होत होती.रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासंदर्भात नगरपरिषदेला दि.१३ आक्टोबर २०२३ रोजी कळविले.तद्नंतर दि.०८ नोव्हेंबर रोजी निवेदन दिले.नगरपालिकेने दि.१९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत जर अतिक्रमण न काढल्यास विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्काराचा नागरिकांनी दिलेला होता.अखेर दि.(१८) नोव्हेंबर रोजी विभागीय अधिकारी अरूणा संगेवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे,अधिक्षक उल्हास राठोड, अभियंता राहेरकर अभियंता कंटाळे, दांगटेसाहेब गोविंद काळेसाहेब ,चालक संग्राम नागरगोजे, महाबळेसाहेब सह संबंधित कर्मचारी न.पा. प्रशासनाने दखल घेऊन अतिक्रमण हटविले असल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## राज्यात महाविकास आघाडीचे १७० आमदार निवडून येणार : रोहित पवार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मोदी शहा आणि महायुती सरकार मधील नेते या राज्यात जाती जाती मध्ये द्वेष निर्मान करण्याचे काम करत असून ही साधू संतांची भूमी असल्याने त्यांना ४४० व्होल्टेज चा झटका बसल्या शिवाय राहणार नाही. राज्यात महाविकास आघाडीचे १७० आमदार निवडून येणार असून या मध्ये केज मतदार संघाचे पृथ्वीराज साठे यांचा नंबर असणार आहे असा आत्मविश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी व्यक्त केला आहे. केज विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार माजी आमदार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत मा रोहित दादा पवार हे बोलत होते. या वेळी व्यासपीठावर खा. बजरंग सोनवणे, माजी आमदार ॲड. उषा दराडे, माजी आमदार प्रा. सौ. संगीता ठोंबरे, डॉ. अंजली घाडगे, राजकिशोर मोदी, हारूण इनामदार, सुरेश तात्या पाटील, डॉ नरेंद्र काळे, बबन लोमटे, संजय भोसले, डॉ राजेश इंगोले, ॲड शिवाजी कांबळे, दिलीप काळे, अमर देशमुख, भाई मोहन गुंड, अंकुश ढोबळे, कॉ बब्रुवान पोटभरे, ॲड इस्माईल गवळी, शैलेंद्र पोटभरे, व्यंकटेश चामनर, महादेव आदमाने, बन्सी अण्णा जोगदंड, शिवसेनेचे शिवाजी कुलकर्णी, रत्नाकर शिंदे, मदन परदेशी, दिलीप जोशी, सौ संजीवनी देशमुख, अजिंक्य चांदने, रमीज राजा, राजेश वाव्हळे, हाजी साहेब, नसरीत बागवान यांच्या सह विविध पक्षांचे नेते कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की, पृथ्वीराज साठे हे १०० टक्के आमदार



होणार आहेत, साठे हा साधा माणूस आहे. लोकांसाठी प्रामाणिक पणे काम करणारा माणूस, छोट्या घरात राहणारा आहे. हा फुले शाहू आंबेडकर यांचे विचार मानणारा महाराष्ट्र आहे. राज्यात या वेळी १७० आमदार निवडून येणार व या साठी पवार साहेब दररोज ४ सभा घेत आहेत ते विरोधकांना गोहाटीला पाठवल्या शिवाय स्वस्थ बसणार नाहीत. मुंबई मध्ये मोदी साहेबांची सभा घेतली. १ लाख खुर्च्या होत्या २० हजार खुर्च्या भरल्या त्यांनी आता महाराष्ट्र चा नाद सोडला आहे. या मतदारसंघात शेतकऱ्यांना शेतीमालावर प्रक्रिया करणारा उद्योग व्हावा ही अपेक्षा फोल ठरली, सिंचन सुविधा वाढल्या नाहीत. बुटेनाथ साठवण तलाव झाला नाही . हा तलाव झाला तरच अंबाजोगाई शहराचा सिंचनाचा प्रश्न सुटेल. या वेळी पारुबाई पांडे यांच्या तर्फे ५० हजार, डॉ राजेश इंगोले यांच्या तर्फे ५० हजार, कैलास लव्हरी यांच्या तर्फे ७५ हजार रु यांच्या सह आणखी काही नागरीकांनी पृथ्वीराज साठे यांना आर्थिक मदत करण्यात आली.

### समाजाचे प्रेम,आपुलकी पुढे नेहाताई संदीप क्षीरसागर भावूक

# दाजीला एकटे न राहू देता पुन्हा आमदार करणार शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांची ग्वाही

### कुटेवाडी येथील प्रचार सभेने आ.संदीप शिरसागर यांच्या विजयावर शिक्कामोर्तब

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदार संघाच्या विकासासाठी मागील ५ वर्षापासून लोकप्रतिनिधी या नात्याने कामे करत असताना सर्वसामान्य, वंचित, उपेक्षित घटकांना न्याय देण्याचे काम आ.संदीप क्षीरसागर यांनी केले. शासनाच्या विविध योजना मतदार संघातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. गरिबांना घरकुले मिळावीत गावातील अंतर्गत रस्ते, पाणंद रस्ते यासह विविध विकास कामे पूर्णत्वास नेण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. मात्र आता विधानसभा निवडणुकीत राजकीय विरोधक त्यांना एकटे पाडण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत.अशावेळी तुम्ही सर्व बंधू-भगिणी आ.संदीप भैयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आहात. तुमचे हे प्रेम आणि आपुलकीपुढे मी नतमस्तक होते असे सांगत सौ.नेहाताई संदीप क्षीरसागर कुटेवाडी येथील प्रचार सभेत बोलताना मतदारांपुढे भावूक झाल्या तर आमच्या जावयाला आम्ही एकटे राहू देणार नाही. आम्ही कायम संदीप भैय्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहोत अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख




गणेश वरेकर व गोरख सिंघण यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष आणि महाविकास आघाडीचे बीड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांनी संपूर्ण मतदार संघ पिंजून काढला आहे. जनतेनेचे निवडणूक हाती घेतल्याने संदीपभैय्यांचा विजय निश्चित झाला आहे.आ.संदीप क्षीरसागरांनी केलेली विकासकामे आणि जनतेशी असलेल्या थेट संपर्कामुळे विरोधकांचे अवसान गळाले असून मतदारसंघातील गावोगावी आता 'गावोगावी एकच नारा, संदीपभैय्या सबसे न्यारा' अशा घोषणा देवून जोरदार प्रचार केला जात आहे. रविवारी मतदारसंघातील कुटेवाडी येथे नेहा ताई संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत प्रचार सभा झाली. यावेळी त्यांनी सर्व मतदार बंधू-भगिनींनी येत्या २० नोव्हेंबरला तुतारी वाजवणारा माणूस चिन्हासमोरील बटन दाबून बहुमतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

तर सर्वांना सोबत घेवून प्रत्येकाशी सौजन्याने राहणारे नेतृत्व पुन्हा बीडकरांना हवे आहे.त्यासाठीच बीड मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष, महाविकास आघाडी व मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांना पुन्हा एकदा यंदा विधानसभेत विजयी करण्याचा निर्धार मतदारांनी केला असून आ.संदीप क्षीरसागर यांनी मागील पाच वर्षात बीड मतदार संघात केलेली विकासकामांची पावती म्हणून आपणही सर्वांनी आपले मत त्यांना द्यावे. असे आवाहन महाविकास आघाडीतील घटकपक्ष तथा शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाध्यक्ष गणेश वरेकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र मस्के व गोरख सिंघण यांनी केले. या प्रचार सभेला मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला.महाविकास आघाडीतील घटक पक्ष असणारे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या वतीने कुटेवाडी येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी आ.संदीप क्षीरसागर, सौ.नेहाताई क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, सौ.वरेकर ताई या सर्वांचे कुटेवाडी येथील ग्रामस्थ, माता भगिनीं व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले.दरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्व पदाधिकारी, शिवसैनिक यांचे आभार व्यक्त करत येणाऱ्या २० नोव्हेंबरला आपण भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन केले.

संपादकीय

# नवसर्जनाचे अभिजात आमंत्रण

लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक तारा भवाळकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड स्वागतार्ह आहे. आता ही निवडणूक होत नाही. यंदाही अनेक नावे चर्चेत आली असतील. मात्र, वयाचे ज्येष्ठत्व आणि साहित्य–संस्कृती क्षेत्रातली अनेक दशकांची तपस्या पाहता तारा भवाळकर यांची निवड समाधानाची आहे. हे संमेलन दिल्लीत होते आहे, हे जसे महत्त्वाचे; तसेच, ते केंद्र सरकारने मराठी भाषेला ‘अभिजात’ असा दर्जा प्रदान केल्यानंतरचे पहिले संमेलन आहे, हेही मोलाचे आहे. संमेलनांची दिंडी आता ९८व्या मुक्कामावर आहे. दोन पावलांनी शताब्दी येईल. त्याचीही तयारी अनेकांच्या मनात सुरू असेल. मात्र, आताचे संमेलन आणि त्याच्या संयोजकांनी ही ‘अभिजात’ची महत्त्वाची घडामोड लक्षात घेऊन संमेलनातील कार्यक्रम, परिसंवाद, चर्चा आणि एकूण आयोजन यांचा रोख भविष्यवेधी ठेवायला हवा. मराठी भाषा ‘अभिजात’ झाल्यानंतर मुंबईत जो छोटेखानी कार्यक्रम झाला; त्यातली डॉ. सदानंद मोरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोघांचीही भाषणे अतिशय महत्त्वपूर्ण होती. एक मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र हे मराठी राज्य जन्माला आल्यानंतरचा तीन ऑक्टोबर, २०२४ हा सर्वांत महत्त्वाचा दिवस आहे, असे डॉ. मोरे म्हणाले. ते इतिहासापेक्षाही भविष्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. राज्य सरकार आता दरवर्षी तीन ऑक्टोबर हा ‘मराठी अभिजात भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा करणार आहे. कोणतेही दिवस साजरे करण्याची सरकारची आजवरची रीत पाहता ‘मोले घातले रडाया, नाही आसू नाही माया...’ असे होण्याची भीती असते.सरकारी खात्यांच्या डोक्यावरचे एक दोडके ओझे तेवढे अशा निर्णयांनी वाढते. पंतप्रधान मोदी यांनी मुंबईतल्या भाषणात मराठीच्या भविष्याचे जे रमणीय, प्रेरक चित्र रंगविले; ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण नुसते सोहळे करण्याच्या पलीकडे काय करू शकतो, याचा विचार राज्य सरकार आणि साहित्य संमेलने यांना आजवरचे कल्पकतेचे दारिद्र्य फेडून करावा लागणार आहे. तो जिद्दीने प्रत्यक्षात आणावा लागणार आहे. मोदी म्हणाले की, आता देशात सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकण्याची सुविधा मिळू शकेल. तेथे नवे संशोधन होऊ शकेल. पण हे आपोआप कसे होणार? तिथे त्यासाठी विद्यार्थी हवेत आणि शिक्षकही. बृहन्महाराष्ट्रातील आणि खरेतर जगभरातील मराठी संस्था, मराठी संस्कृती आणि मराठी समाज यांचे आपण काही देणे लागतो; असा सर्जक विचारच राज्य सरकारला व साहित्य संमेलने घेणाऱ्यांना कधी स्पर्श करीत नाही. वाढत्या बोलीच्या लिलावात संमेलन जिंकल्यासारखे वागणाऱ्या अनेक आयोजकांचे तर ‘आतले हेतू’ भलतेच असतात. यापुढे, हे मोडून काढावे लागेल. तेथे उत्सवांच्या पलीकडे मराठी भाषा व समाजाच्या भविष्याची क्रियाशील चर्चा व्हावी लागेल. मोदी या कार्यक्रमात सांगत होते की, मराठीसाठी काम करणाऱ्या सगळ्या संस्था, संघटना, विद्यापीठे यांच्या पाठीशी आता केंद्र सरकार उभे राहील. हेही आपोआप होणार नाही. त्यासाठी, हातात नेमकी कार्यक्रम पत्रिका घेऊन संसाधनांसाठी सरकारशी सतत संवाद करावा लागेल. भांडावे लागेल. मराठी माणसाचा स्वभाव ‘भांडकुदळ’ असल्याचे इतिहासात नोंदले आहे. हे खरे असते तर ‘अभिजात’ प्रस्ताव इतकी वर्षे रखडला नसता. आता झाले ते झाले. तंत्रज्ञानाच्या अफाट व चौफेर प्रगतीमुळे भाषेच्या प्रांगणात काय घडू शकते, यांची अनेक उदाहरणे मोदींनी दिली. ते पाहता कृत्रिम प्रज्ञेसहित इतर तंत्रसाधने वापरून आपण मराठीचा परीघ जगभर कसा वाढवू शकू, यावर संमेलनात कृतिकार्यक्रम ठरायला हवा. संमेलनांचा भर ललित साहित्यावर असतो. ते योग्यही असेल. आता केवळ तेवढे न करता मराठी भाषा व संस्कृतीपुढच्या आव्हानांना तंत्रज्ञानाची मदत घेऊन कसे भिडता येईल, यावर संमेलनाने लक्ष वळवायला हवे.नवे मातृभाषाकेंद्री शैक्षणिक धोरण मराठीच्या विकासाच्या अनंत संधी घेऊन आले आहे; असे पंतप्रधान म्हणत असतील तर त्या प्रत्येक संभाव्य संधीचा आराखडा संमेलनात तयार का होऊ नये? मराठीचा असा विस्तार झाला तरच उद्या नवे वाचक घडतील. ते मग साहित्याकडे वळतील आणि संमेलनेही अक्षुण्ण चालू राहतील. ‘अभिजात’ हा नुसता शिक्का पडलाय. पुढे काय? या जातीचे नैराश्यवादी महाराष्ट्रात अनेक शतके आहेत. ते असणारच आहेत. खरा प्रश्न हा निर्णय आपण मराठी समाज म्हणून किती सघन व सफळ बनवतो, हा आहे. ही जबाबदारी साहित्य संस्थांनी घ्यावी. त्यांना सगळे कळते असे नाही. त्यांनी तज्ज्ञांशी, तंत्रज्ञांशी, तत्त्वचिंतकांशी बोलावे. काळ झपाट्याने बदलतो आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाला रोज ‘नवी क्षितिजे’ दिसत आहेत. हे सर्जक वारे शिडात भरून घेतले नाहीत तर संमेलनांचे नुसतेच उत्सव राहतील आणि अभिजात हा दरवर्षीचा सरकारी दिन होईल. तसे होता कामा नये.

# आपल्या पत्रातील भावना मनाभावाच्या माणसापर्यंत पोहचविण्याचे साधन ‘टपाल’




९ ऑक्टोबर हा पहिला जागतिक पोस्ट दिवस १९६९ मध्ये टोकियो, जपान येथे यूनिवर्सल पोस्टल यूनियन काँग्रेसमध्ये घोषित करण्यात आला. भारतीय शिष्टमंडळाचे सदस्य श्री आनंदमोहन नरुला यांनी हा प्रस्ताव सादर केला होता. तेव्हापासून टपाल सेवांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी जगभरात जागतिक पोस्ट दिवस साजरा केला जातो. ‘इंडिया पोस्ट’ या ब्रँड नावाखाली व्यवहार करणारे टपाल विभाग ही भारतातली सरकारद्वारे संचालित अशी टपाल प्रणाली आहे, जी दळणवळण मंत्रालयाची एक उपकंपनी आहे. १ ऑक्टोबर १८५४ रोजी ब्रिटिश भारतात लॉर्ड डलहौजी ह्यांनी आधुनिक भारतीय टपाल सेवेचा पाया रचला. डलहौजी ह्यांनी एकसमान टपाल दर (सार्वत्रिक सेवा) लागू केलेत आणि ‘इंडिया पोस्ट ऑफिस ॲक्ट १८५४’ मंजूर करीत लॉर्ड विल्यम बेंटिक ह्यांच्या भारतात टपाल विभागाची स्थापना करण्याविषयीच्या १८३७ च्या कायद्यात दुरूस्ती केली.

दरवर्षी ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन किंवा 'वल्ड पोस्ट डे' हा दिवस जगभरातून साजरा केला जातो. इंटरनेटच्या काळात आजही लोकं टपालसेवेचा वापर करतात आणि त्यावरचा लोकांचा विश्वास कायम आहे. एका शहरातून दुसरीकडे टपाल पाठविण्याचं सर्वात सोपं आणि स्वस्त साधन आहे ते म्हणजे पोस्ट सेवा. फक्त देशातच नाही तर जगातील कोणत्याही देशात टपाल पाठविण्यासाठी या सेवेचा लाभ घेता येतो. टपाल दिवस साजरा करण्याचा हेतू एवढाच कि, टपाल सेवा आणि त्यातील विभागांविषयी लोकांना जागरुक करणे होय. स्मार्टफोनच्या जमान्यात पत्र कोण पाठवेल? हा प्रश्न नक्कीच तुमच्या मनात देखील आला असेल. मात्र आजही भारतातील काही ठिकाणी पत्र हेच एकमेकांशी संपर्क करण्याचं साधन आहे. 'टपाल' हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा, काळ बदलला तरी आजही त्याचे महत्व कायम आहे. एक काळ असा होता, जेव्हा लोक दिवस–रात्र पत्रांची वाट पाहत असे. मात्र बदलत्या काळाबरोबरच आणि तंत्रज्ञानाबरोबर मोबाईल, सोशल मीडियामुळे क्षणात कोणाशीही संवाद साधता येतो. मात्र आजच्या युवा पिढीला पत्र, पोस्टकार्ड आणि ग्रिटिंगचे महत्त्व हवे तेवढे वाटत नाही. एकेकाळी लोकांसाठी पत्र म्हणजेच सर्वकाही होतं.

युनिवर्सल पोस्टल युनियन (युपीयु) ची उभारणी करण्यासाठी ९ ऑक्टोबर १८७४ मध्ये स्विर्झलंडची राजधानी 'बर्न' येथे २२ देशांनी मिळून करारावर सही केली होती. या घटनेच्या स्मृतीत टोकियोत १९६९ मध्ये आयोजित केल्या गेलेल्या संमेलनात ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन म्हणून घोषित करण्यात आले. १ जुलै १८७६ ला भारत 'युनिवर्सल पोस्टल युनियन' चा सदस्य होणारा पहिला आशियाई देश ठरला. बदलत्या काळासोबत जगातील सर्व टपाल सेवांनी त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये आवश्यक बदल केले आहेत. नवीन तंत्रज्ञानासह टपाल सेवांनी स्वत: ला अधिक जलद केले आहे. डाक, पार्सल, पत्र हे एक्सप्रेसने जाण्याची सेवा सुरु झाली. जवळपास २५ वर्षांपूर्वी या बदलावांना सुरुवात झाली आणि सर्वच स्तरावर तांत्रिक बदल करण्यात आले. आता ऑनलाईन पोस्टल देवाण- घेवाणीवरही लोकांचा विश्वास वाढला आहे. 'युपीयु ने केलेल्या एका सर्वेमध्ये अशी माहिती समोर आली की जगभरातून आजच्या घडीला ६५ पेक्षा जास्त प्रकारच्या ई–पोस्टल सेवा उपलब्ध आहेत. सध्याच्या टपाल व्यवस्थेची सुरवात सतराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झाली. १६८८ मध्ये मुंबई आणि मद्रास इथे कंपनी पोस्टची कार्यालये स्थापन झाली. मात्र त्याद्वारे केवळ कंपनीच्या टपालाचीच ने–आण होई. वॉरन हेस्टिंग्ज हा बंगाल प्रांताचा गव्हर्नर असताना त्याच्याकडे मुंबई आणि मद्रास इलाख्याच्या देखरेखीचे अधिकार होते. त्या काळात १७७४ मध्ये टपालसेवा जनतेसाठी खुली करण्यात आली. पोस्टमास्टर जनरलची प्रथमच नियुक्ती करण्यात आली आणि टपालसेवेसाठी पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने टपालासोबत वापरायला सुरूवात झाली. सुरवातीच्या काळातील अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रेसिडेन्सीं अंतर्गतची टपाल सेवा एकसूत्री असावी असा विचार पुढे आला. त्यातूनच पहिला भारतीय टपाल कायदा, १८३७ हा अस्तित्वात आला. त्यात पुढे बदल करून १८५४ चा टपाल कायदा अस्तित्वात आला. त्याद्वारे देशात टपाल सेवेचा एकाधिकार हा टपाल खात्याला देण्यात आला. २०११ पर्यंत त्यात बदल झालेला नाही. पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने मागे पडून, १ ऑक्टोबर १८५४ पासून चिकट पार्श्वभाग असलेली टपाल तिकिटे वापरात आली.

१९७७ मध्ये भारतानं जाल कूपर यांचं टपाल तिकीट प्रसिद्ध केलं होतं. याचं कारणंही तसंच होतं. जाल कूपर हे टपाल तिकीट या विषयातील जागतिक पातळीवरचे अभ्यासक होते. मुंबईत पारशी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. इंडियाझ स्टॅम्प जर्नलचे संपादन केले होते. भारतातील पहिल्या तिकीट संपादक ब्यूरोचे ते संपादक होते. त्यांनी इम्पायर ऑफ इंडिया फिलाटेलिक सोसायटीची स्थापना केली होती. याच विषयावर त्यांनी पुढे पुस्तकही लिहिलं. त्यांच्या छंदाला त्यांनी शास्त्रीय स्वरुप दिलं. भारतीय टपाल तिकीटांचा अभ्यास जागतिक पातळीवर नेण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. टपाल तिकीट संग्राहक अशी कारकिर्दीची सुरुवात करुन जागतिक पातळी गाठणाऱ्या कूपर यांचे योगदान प्रचंड महत्वाचं आहे, हे त्यांच्यावर काढलेल्या तिकीटांवरुन लक्षात येतं. भारतात २३ टपाल क्षेत्रात विभागले गेले आहेत, प्रत्येक क्षेत्र चीफ पोस्टमास्टर जनरल यांच्या अध्यक्षतेखाली आहे. संपूर्ण देशासाठी ‘डायरेक्टर जनरल ऑफ पोस्ट’ हे प्रमुख पद आहे. युनिव्हर्सल पोस्टल युनियनने कार्यक्षम अशा टपाल सेवेचा मार्ग खुला केला, जी पुढे १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची एक प्रमुख संस्था बनली. भारत स्वतंत्र्य झाल्यापासून ते आजपर्यंत टपाल तिकीटांच्या स्वरुपात, आकारात, रचनेत विविध बदल झालेत. त्यांच्यातील या बदलांमुळे त्या–त्या काळाविषयी माहिती मिळते. टपाल खाते नेते, फुलं, प्राणी–पक्षी, एखादी घटना, रौप्य, सुवर्ण, अमृतमहोत्सवी, शतक, द्विशतक किंवा त्रिशतकनिमित्त तिकीटं काढतं. १९४७ ला जेव्हा भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी पोस्ट तिकीटात बदल करण्यात आला होता. त्या तिकीटावर तिरंग्याचे चित्र दिले होते, तर कधी इंदिरा गांधी, महात्मा गांधी, राजीव गांधी, सचिन तेंडुलकर यांच्या सारख्या थोर व्यक्तींच्या प्रतिमा टपाल तिकीटांवर विशेष काळात होत्या. यावरुन आपल्याला त्या काळात त्यावेळी घडलेल्या घटनांची माहिती मिळते. त्यामुळेच टपाल तिकीटे हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा आहे. हिमाचल प्रदेशमधील हिक्किम नावाच्या गावामध्ये जगातील सर्वात उंचावरील टपाल कार्यालय अर्थात पोस्ट ऑफिस आहे. ४४४० मीटर उंची जेथे श्वास घेण्यास अडचण येते, अशा ठिकाणी १९८३ पासून हे टपाल कार्यालय दुर्गम भागात पत्र पाठवण्याचे काम करते. हिक्किमच्या आजुबाजूच्या गावांचे संचाराचे एकमात्र साधन हे पत्र आहे. या टपाल कार्यालय हिक्किमबरोबरच लांगचा–१, लांगचा–२ आणि कॉमिक गावांमध्ये पत्र पोहचवण्याचे काम करते. बर्फामुळे जून ते ऑक्टोबरच्या काळात या ठिकाणी जाणे शक्य नसते. या टपाल कार्यालयात १९८३ पासून रिनचेन नावाची व्यक्ती पोस्टमनचे काम करत आहे. अनेकदा बर्फामुळे त्यांना घरी परतण्यास अडचणीचा सामना देखील करावा लागतो. तत्परतेने सेवा देणाऱ्या भारतीय टपाल विभागातील सर्वांना ‘आंतरराष्ट्रीय टपाल दिना’ निमित्त मनपूर्वक शुभेच्छा!

**–प्रविण बागडे,नागपूर**

# महागाई नियंत्रित करण्यासाठी

आपण ग्राहक मूल्य निर्देशांकातील वस्तू व सेवा यांचा भार पाहिला, तर खाद्यान्नाचा भार सुमारे ४६ टक्के असल्याचे उघड होते. ही बाब देशातील दारिद्र्य दर्शविणारी आहे. ग्राहक मूल्य निर्देशांकातील वाढ नियंत्रित करण्यासाठी आपल्याला खाद्यान्नाच्या किमतीत होणारी वाढ कमी करायला हवी. असे प्रयत्न आपल्याला सातत्याने व नेटाने सुरू ठेवावे लागतील.



खाद्यान्नाच्या किमती नियंत्रित करणे हे काम आपल्या देशात खूपच अवघड ठरणारे आहे. कारण कृषी उत्पादनांच्या किमती सरकारने वाढवाव्यात यासाठी देशातील सर्व शेतकरी सातत्याने आंदोलन करीत आहेत. तसेच डॉक्टर एम. एस. स्वामिनाथन आयोगाने कृषी उत्पादनांचे किमान आधारभाव एकूण उत्पादन खर्चाच्या दीडपट करावेत, अशी शिफारस सन २००६मध्ये आपल्या अहवालात केली होती. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारने तेव्हा तात्काळ प्रथम गहू आणि नंतर तांदूळ यांच्या किमान आधारभावात अनुक्रमे ३३ व २२ टक्क्यांची वाढ केली. सरकारच्या या कृतीमुळे तेव्हा महागाईचा भडका उडाला होता.

आता देशातील जवळपास सर्व राजकीय पक्ष कृषी उत्पादनांचे किमान आधारभाव सदर आयोगाच्या शिफारशीनुसार एकूण उत्पादन खर्चाच्या दीडपट करावेत यासाठी आंदोलन करीत आहेत. महागाई वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेले हे आंदोलन आहे. जगातील कोणत्याही देशात महागाई वाढविण्यासाठी कोणी आंदोलन केलेले नाही आणि कोणी करणारही नाही. असे आंदोलन ही भारतीय राजकारणाची खासियत होय!

याच्याही पुढे जाऊन आता देशातील शेतकऱ्यांच्या संघटना किमान आधारभाव सांविधिक करावेत यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. सरकारने शेतकऱ्यांची ही मागणी मान्य केल्यास किमान आधारभावापेक्षा कमी किमतीला कृषी उत्पादनांची खरेदी वा विक्री करणे हा भारतीय दंड संहितेनुसार दखलपात्र गुन्हा ठरेल. परिणामी असा व्यवहार करणारे व्यापारी गजाआड बंद होतील. शेतकऱ्यांच्या या (अविवेकी) मागणीला राहुल गांधी यांनी विनाशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. अशा रीतीने देशातील जवळपास सर्व राजकीय पक्ष आणि राहुल गांधी यांच्यासारखे बेजबाबदार राजकीय नेते महागाई वाढावी, आर्थिक आघाडीवर पूर्वी कधीही झाला नव्हता एवढा गोंधळ सुरू व्हावा, या प्रयत्नात आहेत.

वास्तविक देशातील गोरगरिबांना जगणे सुसह्य होण्यासाठी कृषी उत्पादनांचे भाव खालच्या पातळीवर स्थिरावण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढविल्यास कृषी उत्पादनांचे भाव कमी केल्याचा भार शेतकऱ्यांच्या शिरावर पडणार नाही. अशी उत्पादकता वाढविण्यासाठी अनेक उपाय योजावे लागतील. त्यातील सर्वांत महत्त्वाचा उपाय शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे हा होय. तसेच शेतकऱ्यांना संकरित बियाणे उपलब्ध करून देणे, नॅनो रासायनिक खते पुरविणे, कृषी संशोधन व कृषी विस्तार या कार्यक्रमांसाठी सढळ हाताने खर्च करणे असे उपाय करायला हवेत. भारतात भाज्या व फळे यांचे उत्पादन पुरेशा प्रमाणात होत नसल्यामुळे भाववाढीची प्रक्रिया वेगवान झाली आहे. सदर कृषी उत्पादनांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी.

भारताला पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर समुद्राच्या रूपाने एक नैसर्गिक वरदान मिळाले आहे. त्याचा लाभ उठवायला हवा. यासाठी समुद्रातील मासे पकडून लोकांना प्रथिनांचा पुरवठा करण्याचे काम सहज करता येईल. भारतात दूध देणारी सुमारे ३० कोटी गुरे आहेत. परंतु अशी गुरे त्यांच्या अंगभूत क्षमतेच्या केवळ पन्नास टक्के एवढेच दूध देतात. अशा गुरांना पुरेसा ओला व सुका चारा मिळत नाही, हे त्यामागील प्रमुख कारण. तसेच दुभत्या गुरांना पुरेशा प्रमाणात प्रथिनांचा पुरवठा होत नाही.

हरित क्रांती होण्यापूर्वी देशात मोठ्या प्रमाणावर ज्वारी वा बाजरी अशी पिके घेतली जात. अशा पिकांचा कडबा हा चांगले पशुखाद्य होता. परंतु आता ज्वारी वा बाजरी या पिकांखालचे क्षेत्र कमी झाले आहे. त्याच्याऐवजी शेतकरी भात आणि गहू ही पिके घेतात. या पिकांचे अवशेष म्हणजे अनुक्रमे पेंढा व काड गुरांसाठी वैरण म्हणून वापरता येत नाही. तसेच देशात पुरेशा प्रमाणात तेलबियांचे उत्पादन होत नसल्यामुळे गुरांना पेंड पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. यामुळे आज दुभती गुरे कुपोषित आहेत. त्यामुळे ती त्यांच्या अंगभूत क्षमतेपेक्षा कमी दूध देतात.

दुभत्या गुरांना पुरेसा चारा मिळण्यासाठी देशात उपजाऊ पडीक असणाऱ्या दोन कोटी हेक्टर जमिनीपैकी सुमारे १५ टक्के जमिनीवर चाऱ्याची लागवड करायला हवी. तसेच दुभत्या गुरांना पुरेशा प्रमाणात प्रथिने मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतांच्या बांधावर आणि मोकळ्या जागेवर शेवगा व तुती अशा वृक्षांची लागवड करायला हवी. शेवगा व तुती यांच्या पाल्यामध्ये पाल्याच्या एकूण वजनाच्या २५ टक्के प्रथिने असतात. क्युबा या देशात अशा वनस्पतींचा दिवसाला पाच किलो चारा दुभत्या गुरांना देऊन प्रथिनांची गरज भागविली जाते. आपण क्युबाचा कित्ता गिरवायला हवा.

दुभत्या गुरांच्या चाऱ्यापाण्याची व्यवस्था केल्यावर दुधाच्या उत्पादनात भरघोस वाढ होईल. दुधाचे दर खालच्या पातळीवर स्थिरावतील. भारतात दूध उत्पादनाचा व्यवसाय प्रामुख्याने सीमांत शेतकरी व अल्पभूधारक शेतकरी करतात. अशा गरीब शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणे गरजेचे आहे. तसेच देशातील गोरगरीब ग्राहकांना वाजवी भावात दूध मिळणे गरजेचे आहे. अशा रीतीने देशात धान्यांच्या, दुधाच्या आणि मासे यांच्या पुरवठ्यात वाढ झाली तर ती कमी किमतीत उपलब्ध होतील. अशा उत्पादनांच्या किमती कमी झाल्यावर देशातील कुपोषणाची समस्या हळूहळू निकालात निघेल. देशातील कार्यक्षम लोकांच्या संख्येत लक्षणीय प्रमाणात वाढ होईल.

भारतात भाज्या व फळे यांचे उत्पादन पुरेशा प्रमाणात होत नसल्यामुळे अशा उत्पादनांचे भाव वरच्या पातळीवर स्थिरावले आहेत. भाज्या व फळे यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी. सिंचनासाठी असे पाणी उपलब्ध होण्यासाठी उसाखालचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी करावे लागेल. या आव्हानाचे स्वरूप निखळ राजकीय असल्यामुळे उसाखालचे क्षेत्र कमी करणे ही बाब अवघड ठरणार आहे. त्यामुळे भाज्या व फळे यांच्या उत्पादनासाठी पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाला चालना देणे गरजेचे ठरेल. तसेच शेततळ्यांची संख्या वाढवून भाज्या व फळे यांच्या उत्पादनासाठी थोडेफार अधिक पाणी उपलब्ध करून देता येईल. अशा रीतीने धान्यांच्या, दुधाच्या आणि भाज्या व फळे यांच्या उत्पादनात भरघोस वाढ झाल्यावर अशा उत्पादनांचे दर खालच्या पातळीवर स्थिरावू लागतील. या प्रक्रियेची व्याप्ती वाढल्यावर महागाईचा राक्षस बाटलीत बंद होईल. सरकारने अशा सुखद बदलासाठी क्रियाशील होण्याची गरज अधोरेखित होते. हा मार्ग पारंपरिक रस्त्यापेक्षा वेगळा आहे. परंतु विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी या मार्गावरून वाटचाल करावी लागणार आहे.

# ही लढाई नुसती उरणची नाही तर महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या स्वाभिमानाची लढाई आहे-राऊत

**उरण । विठ्ठल ममताबादे**

ही लढाई नुसती उरणची नाही, तर महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या स्वाभिमानाची लढाई आहे. ही क्रांतीकारकांची भूमी आहे. स्वातंत्र चळवळीचे महत्त्व या भूमीला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये महाराष्ट्रातले कार्यकर्ते लढले आहेत. या लढ्यात आगरी समाजाच्या कार्यकर्त्यांचे योगदान आहे. आपल्या हक्काचा उमेदवार मनोहर भोईर यांना विधानसभेत पाठवा. त्यांना भरघोस मतांनी विजयी करा. असे आवाहन शिवसेनेचे संजय राऊत यांनी उरण येथे महाविकास आघाडीचे विधानसभेचे अधिकृत उमेदवार माजी आमदार मनोहर भोईर यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि. १६) रोजी आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत केले.

यापुढे बोलताना संजय राऊत यांनी, आपल्या महाविकास आघाडीच्या विजयासाठी एक एक आमदार महत्त्वाचा आहे. त्यासाठी मनोहर भोईर यांची हक्काची ही उरणची जागा कोणत्याही परिस्थितीत आपल्याला जिंकायची आहे. हा आवाज विधानसभेत जायला पाहिजे. हा आवाज भूमिपुत्रांचा आवाज आहे. महाराष्ट्रामध्ये उरणच्या भूमीतून हा आवाज गर्जत राहिला पाहिजे. आपल्याला महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आणायचं आहे. येथील रोजगाराचा प्रश्न बिकट आहे. आपल्या राज्याचा विकास झाला. या भागाचा विकास नाही. इथे बेरोजगारांच्या फौजा वाढत आहेत. महाराष्ट्रातले उद्योग एकापाठोपाठ गुजरातला घेऊन जात आहेत. त्यामुळे आमच्या बायका, मुलांनी, तरुणांनी, बेरोजगारांनी नुसते हात चोळत बसायचे.अशा प्रकारचे काम राज्यामध्ये सुरू आहे. या आमच्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर तिसरी मुंबई उभी राहणार आहे. पहिली, दुसरी आणि आता तिसरी मुंबई इथे होणार आहे. १२४ गावांवर हे संकट येत आहे. भविष्यात आपल्या या शेत जमिनी आपल्या राहणार नाहीत. असे संकट येथे तिसऱ्या मुंबईच्या रुपाने येणार आहे. आणि इथल्या भूमिपुत्रांवर मुंबई, ठाणे, नवीमुंबई येथे जे झाले, तेच इथे उरण पासून अलिबाग पर्यंत होणार आहे. आमच्या भूमिपुत्रांना सुखाने जगू द्यायचे नाही. त्यांच्या जमिनी हिसकावून घ्यायच्या, त्यांचे न्याय, हक्काची कामे, अधिकार हिसकावून घ्यायचे, त्यांना बेरोजगार करायचे, आणि त्यांनी संघर्ष आंदोलने केली की, त्यांच्या अंगावर गोळ्या घालायच्या. त्यांना तुरुंगात टाकायचे. अशा प्रकारचं काम या राज्यात चालू आहे. कधीकाळी अन्यायाविरुद्ध पेटून उठलेला हा तालुका आणि जिल्हा आहे. स्वतः मनोहर भोईर हे देखील संघर्षासाठी तुरुंगात गेले. आहेत. पुन्हा एकदा आपल्याला ही लढाई लढावी लागेल. या महाराष्ट्रात त्यांना विजय मिळाला. तर मुंबई महाराष्ट्रात राहणार नाही. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हात मजबूत करण्यामागे या भागातील तरुणांचे फार मोठे योगदान आहे. त्यांना आता लाडक्या बहिणीची आठवण झाली. महाराष्ट्रात आपले सरकार आलं तर महिलांसाठी पंधराशे नाही. तर ३००० रुपये देऊ. द्यायचे तर सन्मानाने देऊ. महाराष्ट्रात महिलांसाठी प्रवास फुकट. बेराजगार तरुणांच्या हाताला काम मिळेपर्यंत त्यांना महिन्याला चार हजार रुपये दिले जातील. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रत्येक कुटुंबाचा पंचवीस लाखाचा आरोग्य विमा कवच काढला जाईल. शेतकऱ्यांना तीन लाखापर्यंत कर्ज माफ केले जाईल. अशी कामे केली जातील.भावना घाणेकर यांनी उरण शहरात बऱ्याच समस्या आहेत त्या कडे लोक प्रतिनिधी लक्ष देत नाहीत अशी भावना व्यक्त केली . महेंद्र घरत यांनी आपला उमेदवार मनोहर भोईर यांना भरघोस मतांनी निवडून द्या असेही भाषणात सांगितले . यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार मनोहर भोईर, कामगार नेते महेंद्र घरत, काँग्रेसच्या नेत्या हसीना समेद, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या भावना घाणेकर ,शेका पक्षाचे राजेंद्र पाटील, शिवसेना उबाठा उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, शिवसेना उबाठा उरण तालुका प्रमुख संतोष ठाकूर, पाटील जय मुल्ला ,सुधाकर पाटील यांची भाषणे झाली. तर व्यासपीठावर मिलिंद पाडगावकर, विनोद म्हात्रे, जे .डी. जोशी, गणेश शिंदे, अफशा मुकरी, श्रुती म्हात्रे,बी एन डाकी,, प्रकाश पाटील ,मनोज भगत, डॉ. मनीष पाटील, महेश वर्तक, राजेंद्र भगत तसेच महाविकास आघाडीचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# विहामांडवा परिसरात गावठी कटटा काढतुस घेऊन फिरणाऱ्यालाअटक

**विहामांडवा । प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील विहामांडवा परिसरात गावठी कटटा काढतुस घेऊन फिरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा व पाचोड पोलिसांनी शनिवारी रोजी सापळा लावून अटक केली असून.

सदरील व्यक्तीने गावठी कटटा काढतुस कुठून व कशासाठी आणली याबाबत पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

अधिक माहिती अशी की तालुक्यातील पाचोड ते विहामांडवा रोडवर असलेल्या जगदंबा हॉटेल जवळ एक अनोळखी व्यक्ती गावठी कटटा काढतुस सह फिरत असल्याबाबतची गोपनीय माहिती माहिती स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाला मिळाल्याने शनिवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश वाघ, सपोनि इंगळे यांच्या पथकातील पोहकॉ वाल्मीक निकम, शिरसाट, वाघ, घाटेशवर, तरमाळे, तांदळे यांनी सगळी माहिती पाचोड पोलीस ठाण्याचे सपोनि शरदचंद्र रोडगे, विहामाडवा पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक राम बाराहाते, जमादार किशोर शिंदे यांच्यासह पाचोड रोडवरील विहामांडवा परिसरातील हॉटेल जगदंबा येथे सापळा लावून संशयास्पद फिरत असलेल्या संतोष रायभान भोसले रा. खंडाळा गायरान वस्ती ता.पैठण या सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेतले असता त्याच्याजवळ एक गावठी कटटा एक काढतुस किंमत २५ हजार रुपये मुद्देमाल हस्तगत करून गुन्हा दाखल करण्यात आला असून. सदरील आरोपीने गावठी कटटा कुठून आणला व कशासाठी आणला यासंदर्भात पुढील तपास ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राम बाराहाते हे करीत आहे.



# राजेशभैय्या टोपे यांच्या विजयासाठी भव्य प्रचार रॅली

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांच्या विजयासाठी सोमवारी अमोल अण्णा टोपे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, काँग्रेस, शिवसेना (उबाठा) व महाविकास पार्टीच्या वतीने भव्य प्रचार रॅली काढण्यात आली असून या प्रचार रॅलीला मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सोमवारी रांजणी येथील विविध प्रभागात महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांची प्रचार रॅली काढण्यात आली. या प्रचार रॅलीत रांजणी व परिसरातील शेंकडों नागरिक सज्ञभागी झाले. प्रचार रॅलीनंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी राजेशभैय्या टोपे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांनी भ्रमणध्वनीवरून मतदारांना विविध विषयांवर मार्गदर्शन करून त्यांना आशिर्वादरुपी मतदान करण्याचे आवाहन केले. राजेशभैय्या टोपे यांनी केलेल्या विविध विकास कामामुळे त्यांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# प्रचाराच्या तोफा आज थंडावणार आता आर्थिक मोर्चेबांधणी सुरू

**गंगापुर । प्रा.संजय तुपे**

गंगापूर खुलताबाद विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा मंगळवारी १८ नोव्हेंबर रोजी ५ वाजता थंडावनार आहे. भाजपाकडून आमदार प्रशांत बंब तर शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून आमदार सतीश चव्हाण, वंचित बहुजन आघाडी कडून अनिल चंडालिया, तर अपक्ष म्हणून प्रा. सुरेश सोनवणे यांमध्येही या प्रमुख लढती होणार आहेत. गेले तीन आठवडे गंगापुर तालुक्यात उडालेला विधानसभा निवडणूक प्रचाराचा धुरळा अखेर सोमवारी सायंकाळी खाली बसनार आहे. आता भेटीगाठी, गुप्त बैठका याचे पेव फुटले आहे. मतदारांना पैसे, भेटवस्तू आणि दारू वाटण्याचे प्रकार रोखण्यासाठी पोलीस व निवडणूक आयोगाची भरारी पथकांची करडी नजर आहे. गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदारसंघांत २० नोव्हेंबरला ३ लाख ५८ हजार मतदार १८ उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला करतील. तर मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. गेले तीन आठवडे कधी प्रचारसभा, कधी रोड शो तर कुठे पदयात्रा, कुठे बाईक रॅली... असा दोन्ही तालुक्यात प्रचाराचा धडाका सुरू होता. यंदा प्रथमच तीन तीन पक्ष समोरासमोर असल्याने व वंचित बहुजन आघाडी सह अपक्ष उमेदवारांची प्रचाराची ही रणधुमाळी शिगेला पोहोचली होती. आज प्रचार संपणार असला तरी आता उमेदवारांची आर्थिक मोर्चेबांधणी सुरू होणार आहे.

# अनिल जगताप यांच्या कुटुंबियांडून मा.मनोज दादा जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत

**बीड (प्रतिनिधी):** संघर्षयोद्धा सन्मानीय मनोजदादा जरांगे पाटील यांचे काल दि. १७ नोव्हेंबर रोजी बीडमध्ये आगमन होताच बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांचे कुटुंबिय तथा सहकाऱ्यांकडून मा. मनोजदादा जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम जगताप कुटुंबातील सर्व महिलांनी मिळून मनोजदादा यांचे औक्षण केले. त्यानंतर अनिलदादा जगताप यांचे बंधू किशोर जगताप, विजय जगताप आणि चिरंजीव आकाश जगताप यांनी मनोजदादा यांच्या गळ्यात पुष्पमाळ घालून हृदय सत्कार करत त्यांचे जंगी स्वागत केले व मनोजदादांच्या पाया पडून आशीर्वाद घेतले. यादरम्यान अनिलदादा यांचे सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवाराने फटाक्यांची आतिषबाजी केली. सर्व समन्वयक मराठा सेवकांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या हर्षल्हासात संघर्षयोद्धाचा स्वागतविधी मोठ्या थाटामाटात संपन्न झाल्याने उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह संचारल्याचे दिसून येत होते. मा. जरांगे पटलांच्या आगमनी बीडकरांची देखील मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# ३३ मुख्याध्यापकांचा निलंबनाचा आदेश

## जिल्हाधिकारी:संस्थाचालकांना सूचना

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

: जिल्ह्यातील ३३ खासगी अनुदानीत शाळांच्या मुख्याध्यापकांवर शिक्षण विभागाने गुन्हे दाखल केले. आता त्या मुख्याध्यापकांना निलंबित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील ९२ शाळांनी कर्मचाऱ्यांची माहिती निवडणूक विभागाला सादर केली नव्हती. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी त्या शाळांच्या मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. आतापर्यंत प्राथमिक १७ आणि माध्यमिकच्या १६ अशा ३३ शाळांच्या मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल झाले.विधानसभा निवडणूक कामासाठी विविध सरकारी कार्यालये, अनुदानित खासगी शाळा, महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवा निवडणूक विभागाकडे वर्ग करण्यात येतात....तर शाळांचे अनुदानबंदची शिफारस ✻ निवडणूक कामासाठी कर्मचाऱ्यांची माहिती न देणाऱ्या सर्व शाळा खासगी आहेत. त्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाच्या कारवाईचे अधिकार संस्थाचालकांना आहेत. त्यामुळे ३३ शाळांच्या मुख्याध्यापकांना निलंबित करण्याबाबत शिक्षण विभागाकडून संस्थाचालकांना सूचना देण्यात येणार आहेत. संस्थाचालकांनी तशी कार्यवाही केली नाही तर त्या शाळेचे अनुदान बंद करण्याची शिफारस शिक्षण सचिवांकडे केली जाईल, असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले, त्यानुसार विभागांकडून शैक्षणिक संस्थेतील कर्मचाऱ्यांची माहिती मागविली होती. परंतु, ती माहिती ३३ शाळांकडून मिळाली नाही

# विद्यमान आमदार मतदार संघात रोजगाराच्या संधी उपलब्ध करु शकले नाहीत-राजकिशोर मोदी

## पृथ्वीराज साठे यांच्या पाठीमागे खंबीर ताकत ;विजयश्री खेचून आणणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केज विधान सभेच्या विद्यमान आमदार या मतदार संघातील युवा बेरोजगारांसाठी कसल्याही रोजगाराच्या संधी उपलब्ध करू शकल्या नसल्याची खंत राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. त्यांनी मतदारसंघात केवळ गुत्तेदार पोसण्यापलीकडे काहीच केले नसल्याचे मत देखील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहरात शहराच्या विविध भागात आयोजित बैठकीत बोलत होते. साठे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहरातिल रविवार पेठ, फालोअर्स क्वार्टर, स्नेह नगर, झारे गल्ली परिसरात आयोजित बैठकीत बोलत होते.

बैठकीत पुढे बोलताना राजकिशोर मोदी यांनी शरदचंद्र पवार यांनी केज मतदार संघात एक सर्वसामान्य माणसाला उमेदवारी दिली असून त्यांच्या विजयासाठी आपण सर्वजण कसोशीने प्रयत्न करून त्यांची विजयश्री खेचून आणू असे आवाहन राजकिशोर मोदी यांनी केले. येणाऱ्या काळात नगर परिषदेच्या माध्यमातून घरकुल योजना प्रभावीपणे राबविण्याचे धोरण अवलंबिणार असल्याचे मोदी यांनी सांगितले. ४० ते ५० वर्षांपासून एकाच ठिकाणी राहणाऱ्या कुटुंबास मालकीत घेण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन राजकिशोर मोदी यांनी यावेळी दिले. मागील काही दिवसांपूर्वी जागा मोजून ताब्यात घेण्यासाठी अंबाजोगाई शहरात मिलिटरीचे अधिकारी आले असतांना त्यांना शहरातून परत पाठविण्याचे काम राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने झाले असून यापुढेही नागरिकांना सर्वस्तरातून मदत करण्यासाठी तत्पर राहू असे अभिवचन राजकिशोर मोदी यांनी शहरवासीयांना दिले.

तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना संपूर्ण केज मतदार संघातून दिवसेंदिवस वाढता पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे पृथ्वीराज साठे यांचा विजयी रथ कोणीच रोखू शकत नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे समोरील भाजपाचे उमेदवार यांच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याने ते हवालदिल झाल्याचे दिसत आहे. अंबाजोगाई शहरात देखील राजकिशोर मोदी यांच्या माध्यमातून पृथ्वीराज साठे यांना वाढता पाठिंबा मिळत आहे. शहरातील विविध प्रभागात पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ सर्वधर्मीय बैठकांचा धडाका सुरू आहे. या बैठकीतून अनेकजण आपापला पाठिंबा जाहीर करत आहेत.

याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या सोबत मनोज लखेरा, राजेंद्र मोरे, खालेद चाऊस, रमीज सर, समियोद्दिन खतीब, अमोल लोमटे, गणेश मसने, सुनील वाघाळकर , हाजी खालेक, ऍड.इस्माईल गवळी , अमजद शेख यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



# बदामराव पंडित यांचा विजय रोखणे विरोधकांना आता शक्य नाही-मा.आ.धांडे

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये गोरगरिबांनी सामान्य माणसाला बदामराव पंडित हे कायम आपले वाटतात. कोणतीही अडीअडचण असली तरी त्यांच्याकडे जाऊन आपण ती सांगू शकतो आणि सोडवून घेऊ शकतो हा विश्वास लोकांना वाटतो. विरोधकांनी कितीही घाणेरडे राजकारण केले आणि अफवा पसरवल्या तरी सुद्धा यावेळी बदामराव पंडित यांचा विजय रोखणे हे विरोधकांना आता शक्य नाही असा ठाम विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गेवराई मतदार संघाचे समन्वयक माजी आमदार सुनील धांडे यांनी व्यक्त केला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारासाठी माजी आमदार सुनील धांडे यांनी सिरसदेवी सर्कल मधील अनेक गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्यासमवेत उमेदवार बदामराव पंडित हेही उपस्थित होते. श्रीदेवीच्या नांदेड चौक रुई कॉर्नर येथे झालेल्या बैठकीत बोलताना माजी आमदार सुनील धांडे म्हणाले की, २४ तास गोरगरिबांच्या गराड्यात राहून त्यांची काम करत असलेले बदामराव पंडित हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय उमेदवार आहेत. त्यांना मतदारसंघातल्या जनतेची जेवढी खंबीर साथ आहे तेवढीच पक्षाची सुद्धा साथ आहे. महायुतीचे उमेदवार हे खोटी आश्वासन देऊन जनतेला फसवण्याचे काम करत आलेले आहेत. केवळ दादागिरी करून धमक्या दिल्याने लोकांची मते मिळत नसतात हे गेल्या ३० वर्षात गेवराईकरांनी दाखवून दिले आहे. जी माणसं आमदार व्हायच्या अगोदरच लोकांना राष्ट्रीय कार्यक्रम करू असं म्हणत धमक्या देत आहेत त्यांना गेवराईतली जनता कधीच भीक घालणार नाही असे सांगून सुनील धांडे म्हणाले की बदामराव पंडित हे खमक्या नेतृत्व आहे ज्यांनी गरिबावर अन्याय करून दादागिरी करण्याचा प्रयत्न केला ती दादागिरी मोडूत काढण्याचे काम फक्त बदामराव पंडित यांनीच केले आहे त्यामुळेच गोरगरिबांना त्यांच्यावर विश्वास आहे. २३ नोव्हेंबर नंतर बदामराव पंडित हे मोठ्या मताधिक्याने विजयी झालेले गेवराईचे आमदार असतील आणि पराभूत झालेले विरोधक तालुका सोडून बीड नाहीतर पुण्याला जाऊन राहतील असेही सुनील धांडे म्हणाले.

याप्रसंगी माजी सभापती पंढरीनाथ लगड, अशोक नांदे, नवनाथ पवार, विठ्ठल रुचके, राजाभाऊ रोमन, बंडू पटाईत, दामू मोरे, बाळू नांदे, गाडे पाटील कोळगावकर, संभाजी नवले, गणेश घोंगडे, साईनाथ आडगळे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते



### तुमचा कार्यक्रम करतो बोलणाऱ्याला मतदान रुपी पाडा-बदामराव पंडित

# साईनाथ अडागळे, संभाजी नवले यांच्या नेतृत्वाखाली रुई येते कॉर्नर बैठक संपन्न





**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील रुई येथे आज दि १८ /११/ २०२४ रोजी गेवराई विधानसभा मतदार संघांचे आदिकृत उमेदवार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे मा.बदामराव आबा पंडित यांच्या उपस्थिती मध्ये कॉर्नर बैठक संपन्न झाली.सविस्तर माहिति अशी कि,आज सकाळी ८ वाजनेच्या सुमारास रुई येथे डीपीआय चे गेवराई युवक तालुका अध्यक्ष साईनाथ अडागळे, संभाजी नवले यांनी शिवसेनेचे आदिकृत उमेदवार बदामराव आबा पंडित यांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख म्हणून बदामराव पंडित,पंढरीनाथ लगड,सुभाष शिंदे, नारायण गाडे, शेख फत्तू मामू, महादेव खेत्रे, विलास गरड, सतीश राठोड अनेक प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थिती मध्ये तसेच गावातील नागरिक, युवक, कार्यकर्ते यांच्या उपस्थिती मध्ये कॉर्नर बैठक संपन्न झाली. यावेळी साईनाथ अडागळे, शेख रईस,संभाजी नवले,गणेश रहाडे यांनी बदामराव आबा पंडित यांचा सत्कार केला व अडागळे यांनी कार्यक्रमाचे प्रस्थाविक केले तसेच शिवसेनेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आदिकृत उमेदवार यांना रुई येतुन सर्वाधिक मताधिक्य देण्याचे आव्हान अडागळे यांनी नागरिकांना केले.

यावेळी बदामराव पंडित यांनी आपले मनोगत व्यक्त केले कि महायुती सरकार ने शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही, कापसाला भाव नाही, सोयाबीनला भाव नाही अश्या महायुतीच्या उमेदवाराला निवडून देऊ नका. महाविकास आघाडी चे सरकार असताना तेव्हा उद्धव साहेबांनी शेतकऱ्याचे कर्ज माफ केले आणि महायुती सरकारणे उद्योगपती लोकांची कर्ज माफ केली तसेच महायुतीचे उमेदवार म्हणतात तुमचा करेक्ट कार्यक्रम करू अश्या धमक्या लोकांना देणाऱ्या आणि तुमचा कार्यक्रम करणार बोलणाऱ्या महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना पाडा असे आव्हान शिवसेनेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार बदामराव पंडित यांनी रुई येथील नागरिकांना आव्हान केले.कार्यक्रमाला उपस्थित साईनाथ अडागळे, संभाजी नवले,सिद्दिक शेख, शेषेराव खरवडे,विठ्ठल रुचके, गोविंद नवले, बंडू पटाईत, दामू अण्णा मोरे, पत्रकार शाम अडागळे, शेख आसपाक, शाहेद आतार, काशिनाथ अडागळे, लक्ष्मीनारायण शिंदे, गावातील नागरिक, युवक, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# मतदारसंघांत विकास कामात मी भेदभाव केला नाही-प्रशांत बंब




**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

गेल्या सतरा वर्षांपासून वरच्या सभागृहात पदवीधर मतदारसंघांमध्ये आमदार असलेले आणि आता माझ्या समोर उभा असलेले पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार यांना आणि मला समोरासमोर बसून जनतेसमोर प्रिंट आणि टीव्ही माध्यमाच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारावे त्यांनी मागील सतरा वर्षाच्या कार्यकाळातील कामाचा हिशेब द्यावा आणि मी माझ्या पंधरा वर्षाच्या कार्यकाळातील हिशेब देतो. ते तर येणारच नाही. याची मला खात्री आहे. मुस्लिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून, मुस्लिम समाजाचे प्रश्न सोडवणार असल्याचे आ. प्रशांत बंब यांनी सांगितले आहे. गंगापूर येथील जाहीर सभेत बोलताना आमदार प्रशांत बंब यांनी. मुस्लिम समाजाला बोलतानी सांगितले की. मी विकासाच्या कामात भेदभाव केले नाही. मी माझे काम केले आता तुमची बारी आहे. मला निवडून द्यायची. आमदार प्रशांत बंब म्हणाले, जातीपातीचे राजकारण मी कधी केले नाही, करत नाही आणि या पुढेही करणार नाही. गंगापूर तालुक्यातील जनतेने दाखवलेला हा विश्वास मी कदापी विसरणार नाही. प्रत्येक समाजातील सर्वसामान्य घटकाला न्याय देण्याचा माझा प्रयत्न कायम राहील. सर्वांना सोबत घेऊन गंगापूर तालुक्याचा आपल्याला विकास करायचा आहे. आणण्यामध्ये सर्वांच्या सहकार्याने मला यश आले आहे. यापुढे मी निवडून येणार आहे या तालुक्याचा आमदार मीच राहणार आहे असे आमदार प्रशांत बंब यांनी सांगितले आहे. यावेळी माजी आमदार कैलास पाटील, किशोर धनयात, रामेश्वर मुंदडा, शिंदे गटाचे तालुकाप्रमुख दिलीप निरफड, माजी नगराध्यक्ष वंदना पाटील, लक्ष्मणसिंह राजपूत, माजी नगराध्यक्ष फैसल चाऊस, ज्ञानेश्वर निळा, भैय्या पाटील, जाफर शेख, बदर जहुरी, राजेंद्र राठोड, अमोल दादा जगताप, राहुल वानखेडे, हरिश्चंद्र डव्हाण, साईनाथ दारुटे, राकेश कळसकर, भाजपचे शहराध्यक्ष मारोती खैरे, अशोक मंत्री, कृष्णकांत व्यवहारे, दिपक साळवे, अनिल चव्हाण, समीर पठाण, इम्रान शहा, अतुल रासकर, अमित मुंदडा, सविता शहाणे, आयाज अहमद, नाना भाऊ, सय्यद अख्तर, गूलाम शहा, ईद्दू खान, समीर पठाण (भाई), इम्रान शहा, बद्री नांगरे पाटील, सलिम शहा, यांच्यासह आदींची उपस्थित होते.

# रिपाइंचे बंडू मस्के यांचा आ.मुंदडा यांना जाहीर पाठींबा



**केज । सचिन भालेराव**

युवक रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष बंडू मस्के यांच्यासह कार्यकर्त्यांनी केज विधानसभा मतदार संघाच्या उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या जाहीर पाठिंबा दिला आहे.

केज विधानसभा मतदार संघाच्या भाजप तथा महायुतीच्या उमेदवार आमदार नमिता मुंदडा यांच्या प्रचारार्थ केज शहरातील भीम नगर भागात शुक्रवारी जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत युवक रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष बंडू मस्के यांनी बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत बंडू मस्के व कार्यकर्त्यांनी आपले मनोगते व्यक्त करीत उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांना जाहीर पाठिंबा दिला व त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू व विजयश्री खेचून आणू अशी ग्वाही देखील यावेळी कार्यकर्त्यांनी दिली यामुळे नमिता मुंदडा यांची शहरातील ताकत वाढली असून दलित समाजाच्या मतांचा बाजार मांडणाऱ्या नेत्यांना या पाठिंब्यामुळे चांगलीच चपराक बसली आहे

बैठकीस महादेव सूर्यवंशी , विजय केंद्रे, सुधाकर लांब, प्रवीण देशपांडे, भीष्म हजारे, संजय मस्के, प्रेमजीत हजारे, प्रमोद मस्के यांच्यासह तरुण, महिला मोठ्या संख्येने हजर होते.

# सुभाष पाटील यांचे दुःखद निधन

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण नगर परिषदेचे माजी कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते सुभाष पाटील यांचे दिनांक १०/११/२०२४ रोजी अल्पशा आजारामुळे दुःखद निधन झाले आहे.



मृत्यू समयी त्यांचे वय ६६ होते.त्यांचा अंत्यसंस्कार धुळीवाडा उरण येथे करण्यात आले. यावेळी हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. सुभाष पाटील हे प्रेमळ, मनमिळावू,सर्वांशी समजूतदारपणे वागणारे असल्याने त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. सुभाष पाटील यांच्या निधनाने पाटील कुटुंबीयावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ४० वर्षे त्यांनी उरण नगरपरिषद मध्ये सेवा केली.कामगार युनियनचे उपाध्यक्षपदी त्यांनी भूषवले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ मुले,६ नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे. सुभाष पाटील यांचा दहावा विधी दिनांक १९/११/२०२४ रोजी तर बारावी विधी दिनांक २१/११/२०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी उरण धुळीवाडा येथे होणार आहे. या विधी प्रसंगी कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्विकारले जाणार नसल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी कळविले आहे. सर्वांना हवेहवेसे वाटणारे व्यक्तिमत्व असल्याने सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्था,संघटनेचे प्रतिनिधी पदाधिकारी सदस्य यांनी पाटील कुटुंबियांचे सांत्वन करून सुभाष पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# कोरोना काळात प्रीतम जे एम म्हात्रे यांनी केलेली मदत जनता विसरणार नाही

**उरण । विठ्ठल ममताबादे**

कोरोना काळात जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने प्रीतम जे एम म्हात्रे यांनी केलेली मदत पनवेल उरण, खालापूर विधानसभा हद्दीतील नागरिक जनता कधीच विसरणार नाही. गोरगरीब नागरिक तसेच गरजू नागरिकांचा विचार करणारे महाविकास आघाडी, शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रीतम जे एम म्हात्रे यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन करण्यात येत आहे.

दोन चार वर्षांपूर्वी कोरोनामुळे लॉक डाऊन परिस्थितीत अनेकांवर उपासमारीची वेळ आली होती. यावेळी जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने प्रीतम जे एम म्हात्रे यांनी अनेकांना सर्वतोपरी मदत केली. कोरोना



महामारीने अनेकांना आपला जीव गमवावा लागला. मात्र स्वतःच्या जीवाची पर्वा न करता प्रीतम जे एम म्हात्रे यांनी या संकटकालीन परिस्थितीत हजारो नागरिकांना मदत केली. यावेळी किराणा वस्तूंचे कीट, रुग्णालय व्यवस्था यासह सर्वतोपरी मदत करण्यात आली. प्रीतमदादामधून माणुसकी चे दर्शन यावेळी अनेकांना दिसून आले. दरम्यान प्रीतम जे एम म्हात्रे यांना देखील कोरोना झाला होता. मात्र ते यात डगमगले नाहीत. त्यांनी आपली सेवा सुरूच ठेवली.

कोरोनाच्या काळात हजारो अन्य धान्याचे कीट, अन्नधान्य वाटप, मास्क, सॅनिटायझर, औषधे आदी वाटप केली. तसेच अनेक शिबिरे देखील भरवली. हजारोंना आर्थिक मदत देखील केली. करोना काळात अनेक नागरिकांना दिलासा देण्याचे काम जे एम म्हात्रे चारिटेबल संस्थेच्या वतीने प्रीतम जे एम म्हात्रे यांनी केले. प्रीतम जे एम म्हात्रे यांनी रुग्णालयात जाऊन कोरोनाग्रस्त रुग्ण व त्यांच्या कुटुंबांची भेट घेत त्यांना मोठा धीर दिला होता. हे येथील जनतेने पाहिले आहे. अनेक तळागाळात झोपडपट्टीपर्यंत मदत पोहोचवली. ज्या ठिकाणी कोणीही पोहोचले नाही त्या ठिकाणी प्रीतम म्हात्रे मदत घेऊन पोहोचले होते. प्रीतम जे एम म्हात्रे अनेकांच्या मदतीला सामाजिक बांधिलकीने धावून जात असतात. त्यामुळे सुजाण नागरिक म्हणून त्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे आणि प्रीतम जे एम म्हात्रे यांच्या रूपाने हक्काचा माणूस उरण विधान सभेतून निवडून येणे गरजेचे आहे.

# परळी शहरातील भीम नगर येथील अनेक युवकांचा राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटात जाहीर प्रवेश-जगतकर



**परळी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीने आता वेग पकडला असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार गट या पक्षात आज परळी शहरांमध्ये पक्षाची ध्येय धोरणे तथा पक्षाचे विकासात्मक कार्य पाहून परळी शहरातील भीम नगर येथील युवक नेते संजय जगतकर यांच्यासह त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद चंद्र पवार या गटात जाहीर रित्या प्रवेश केला. याबाबत अधिक माहिती अशी की विधानसभेच्या निवडणूक रणधुमाळीने आता महाराष्ट्रात वेग पकडला असून परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघाचे राज्यात हाय व्होल्टेजच मतदारसंघात गणना होते परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने प्रचारात आघाडी घेत पक्षाची ध्येय धोरणे पक्षाचे नेते त्याचा कार्यकर्ते जनसामान्य पर्यंत पोहोचवत आहेत याचाच परिणाम म्हणून या विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार गटात आता जबरदस्त इन्कमिग चालू झाली आहे. येथील संजय जगतकर यांनी त्यांच्या अनेक समर्थकासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार या गटात जाहीर रित्या प्रवेश केला यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गट महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख होते व यांना परळी शहरातील भीम नगर येथून प्रचंड लीड देऊन त्यांना निवडून आणण्यासाठी व पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी आपण कार्य करणार असल्याचे यावेळी संजय जगतकर यांनी सांगितले या प्रवेश सोहळ्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस परळी शहराध्यक्ष अडवोकेट जीवन देशमुख युवक शहराध्यक्ष फिरोज भाई इत्यादी सह उपस्थित होऊन यावेळी भीम नगर येथील संतोष आदोडे रमेश जगतकर राहुल मुंडे मनोहर वाघमारे राहुल जगतकर यांच्यासह अनेकांनी जाहीर प्रवेश करून जास्तीत जास्त मतांनी निवडून आणण्याचा निर्धार केला.

# ऊप जिल्हा रूग्णालय वरोरा येथे जागतिक मधुमेह दिवस साजरा



**वरोरा । प्रतिनिधी**

दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ ला जागतिक मधुमेह दिवस साजरा करण्यात आला.मंचावर डॉ प्रतिक दारूंडे वैद्यकीय अधिकारी डॉ प्रविण केशवानी दंत चिकित्सक वंदना विनोद बरडे अधीसेवीका यांनी उपस्थितांना मधुमेहावर नियंत्रण कसे ठेवायचे काय करायचे काय नाही करायचे याविषयी मार्गदर्शन केले.योगा प्राणायाम,मेडिटेशन, यांचें महत्व समजावून सांगितले.आपल्या दैनंदिन जीवनात आपण आहारावर कसं नियंत्रण ठेवायच हे बघीतले पाहिजे. गोड पदार्थांवर नियंत्रण असायला पाहिजे.झोप चांगली होईल हे बघायला पाहिजे.वंदना बरडे अधीसेवीका यांनी बॉनर, पोस्टर,फ्लीप चार्ट वापरून मधूमेहाची माहीती दिली.सूत्रसंचालन नेहा ईंदूरकर व आभारप्रदर्शन किरणं साळवे यांनी केले.ऊपस्थीतांना आवश्यक प्रश्नांची उत्तरे दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077